# भडगांव नगरपरिषद, भडगांव जि. जळगांव

फोन नं. ०२५९६/२१३२७८, फॅक्स नं. ०२५९६/२१३२७२ ई-मेल - npbhadgaon@gmail.com

**वाचा :-**

१) श्री.मनोहर रामकृष्ण सोनार वगैरे १ यांचा दिनांक १६/१२/२०१५ चा दाखल अर्ज

२) म.सहाय्यक संचालक, नगर रचना, जळगांव यांनी जा.क्र./अभि./ मौजे भडगांव ता.भडगांव/ गट नं.६०४/ ससं-जळ / ३२८७ / जळगांव दिनांक ११/१०/२०१३ चे अभिप्राय

३) या कार्यालयाने जा.क्र. भनप / बांध / १३८७ / २०१४ दिनांक ०८/१२/२०१४ अन्वये बिनशेती कामी केलेली शिफारस

४) म.जिल्हाधिकारी सो जळगांव यांचेकडील बिनशेती आदेश जा.क्र.जमीन / २/ २६ / बिशे /एस आर / २३ /२०१५ दिनांक १०/०६/२०१५

५) म.उपअधिक्षक भुमीअभिलेख भडगांव यांचे कडील सा.बिनशेती / मोरनं. ८१/२०१५ दि.२३/१२/२०१५ चा सिमांकीत मोजणी नकाशा

६) म. सहायक संचालक, नगररचना जळगांव यांचेकडील जा.क्र. सिमां.अभि./ मौजे भडगांव ता.भडगांव गट नं. ६०४/ ससं-जळ / ६८५ / जळगांव दिनांक ११/०३/२०१६ ची सीमांकित अभिन्यासास मंजुरीची शिफारस

७) सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ (महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २२ ऑगस्ट २०१४)

-------------------oooo--------------------

जा.क्र./भनप/अभिन्यास /२०५४/२०१६
दिनांक : ६ / ८ / २०१६

**प्रस्तावना :-**

वाचा क्र. १ नुसार अर्जदार श्री.मनोहर रामकृष्ण सोनार व श्री. किशोर पितांबर पाटील यांनी भूमी अभिन्यासास मंजूरी मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर क्षेत्रात अभिन्यास मंजूरीसाठी मा.जिल्हाधिकारी सो. जळगांव यांचेकडून वाचा क्र.४ नुसार १ ते २७ अटी व शर्तीस अधिन राहून 'बिनशेती आदेश' दिलेले आहे. तसेच वाचा क्र. ६ नुसार म.सहाय्यक संचालक, नगर रचना जळगांव यांनी सिमांकित अभिन्यासास १ ते १७ अटी व शर्तीस अधिन राहून शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र शासन, महसुल व वन विभाग यांचे राजपत्र दिनांक २२ ऑगस्ट २०१४ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या सन २०१४ महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ मधील कलम ४२ नुसार मा.जिल्हाधिकारी सो, यांनी जमिनीच्या वापरातील बदलासाठी 'नाहरकत प्रमाणपत्र' दिल्यानंतर संबंधीत नियोजन प्राधिकरण यांनी विकासाची परवानगी द्यावयाची आहे. असे नमुद करणेत आले आहे.

उक्त अध्यादेशानुसार प्राप्त अधिकारान्वये मी, नियोजन प्राधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद भडगांव पुढील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

## -: आदेश :-

मौजे भडगांव ता.भडगांव जि.जळगांव येथील गट नं. ६०४ (एकुण क्षेत्र ३५४०० चौ.मी.) भूमी अभिन्यासास मा.जिल्हाधिकारी सो, जळगांव यांनी 'बिनशेती आदेश' दिल्याने तसेच सहायक संचालक, नगररचना जळगांव यांनी सिमांकित अभिन्यासास शिफारस केलेली असल्याने व सदर जमीनीवर मंजुर जळगांव-भुसावळ प्रादेशिक योजनेच्या तरतुदीनुसार रहिवास वापर अनुज्ञेय असल्याने खालील अटी व शर्तीस अधिन राहून अभिन्यास नकाशे अंतिम मंजुर देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती -**

१) अभिन्यासातील भुखंड रहिवास प्रयोजनार्थ साठी वापरण्यांत यावेत.

२) कुठलाही भुखंड पुढे सक्षम अधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीशिवाय विभागण्यांत येवू नये.

३) अभिन्यास नकाशात दर्शविलेले रस्ते/गटारी नगरपालिकेचे निर्देशाप्रमाणे तयार करुन नगर पालिकेच्या ताब्यात पुढील देखभालीसाठी हस्तांतरीत करावेत.

४) वर उल्लेखिलेले अभिन्यासातील रस्ते/ गटारी प्रत्यक्ष जागेवर तयार केल्याशिवाय व ते स्थानिक प्राधिकरणाच्या ताब्यात दिल्याशिवाय कुठलाही भुखंड विकण्यांत येवू नये.

५) विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार अभिन्यासातील रस्ते नगरपालिकेकडे नाममात्र रु.१/- या शुल्कावर हस्तांतरीत करुन द्यावेत.



Scanned by CamScanner

६) अभिन्यासातील सर्व रस्ते, सभोवतालच्या जमीन मालकांना, जर ते त्यांची जमीन विकसित करणार असतील तर पं रस्त्यासाठी वापरु देण्यांत यावे.

७) अभिन्यासात काही कामे अपूर्ण असल्यास ते पूर्ण करुन देण्याची जबाबदारी अर्जदार यांची आहे. त्याशिवाय तारण ठेवलेले क्षेत्र मुक्त करुन मिळणार नाही.

८) अभिन्यासातील भुखंडाना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी जागा मालकाची असुन त्यांनी सांड पाण्याच्या निचऱ्याची सुध्दा योग्य ती व्यवस्था करावयाची आहे.

९) सदरहु जागेतील सध्या अस्तित्वात असलेली झाडे विना परवानगीने तोडु नये.

१०) सदरहु जागेत जर उच्चदाब विद्युत वाहिनी अस्तित्वात असेल तर ती जागा मालकांने स्वखर्चाने अभिन्यासातील रस्त्यानुसार स्थानांतरीत करुन घ्यावी.

११) नगरपरिषदेने नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे स्थायी निदेश क्र. नपप्रस विकास/कामे /२००५/ प्र.क्र. ३८५४२, दि.१८/५/२००५ अन्वये पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

१२) सदरहु जागेलगत मंजुर अभिन्यासातील रस्त्यांशी किंवा अस्तित्वातील रस्त्यांशी समन्वय साधणे हि अर्जदार यांची जबाबदारी आहे.

१३) सरदहु प्रकरणांत अभिन्यास नकाशांना मंजूरीची शिफारस करतांना अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेले मालकी हक्काचे कागदपत्रे व मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्रे ग्राह्य धरण्यांत आली आहेत. सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभूल करणारे आढळुन आल्यास सदर अभिन्यासातील दिलेली मंजुरी रद्द समजण्यांत येईल.

१४) सदर परवानगी मिळाल्यानंतर ३० दिवसांचे आंत अर्जदार यांनी वापरात बदलाबाबत मा.तहसिलदार भडगांव तसेच तलाठी भडगांव यांना लेखी कळविणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास अर्जदार अकृषिक आकारणी देण्याबरोबरच आणखी पंचवी हजार रुपयांचा द्रव्यदंड किंवा अकृषिक आकारणीच्या चाळीस पट इतकी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम देण्यास पात्र राहील.

१५) हि परवानगी मिळाल्यानंतर अर्जदार यांनी ३० दिवसांचे आंत नियमान्वये विहीत करण्यात आलेल्या नमुन्यात तहसिलदार भडगांव यांचेकडून सनद प्राप्त करुन घ्यावी. व त्याची प्रमाणीत प्रत मुदतीच्या आंत या कार्यालयास सादर करावी.

१६) मा.जिल्हाधिकारी सो, जळगांव यांनी दिलेल्या बिनशेती आदेशातील तसेच म.सहाय्यक संचालक, नगर रचना जळगांव यांच्या शिफारस पत्रातील अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील. त्या पूर्ततेच्या अधिन राहून ही मान्यता देण्यात येत आहे.

१७) महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ मधील उचित अटी व शर्ती लागू राहतील.

१८) वरील अटी व शर्तीचे तसेच अधिनियमातील तरतूदीचे उल्लंघन झाल्यास सदर मंजुरी आपोआप रद्द समजण्यात येईल.

प्रति,

श्री.मनोहर रामकृष्ण सोनार व इतर १

रा. अमळनेर जि. जळगांव

(बबन तडवी)

नियोजन प्राधिकारी तथा मुख्याधिकारी

नगरपरिषद भडगांव

प्रत : मा.तहसिलदार भडगांव

यांना माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर

प्रत : तलाठी भडगांव TRUE COP

यांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर

(बबन तडवी)

नियोजन प्राधिकारी तथा मुख्याधिकारी

नगरपरिषद भडगांव

Scanned by CamScanner




Scanned by CamScanner